# जिल्हा उद्योग केंद्र, यवतमाळ

## जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना (छोटया उद्योगास बीज भांडवल)

### विहित नमुन्यातील अर्जासोबत पुढील कागदपत्रे आवश्यक

१. प्रक्रिया शुल्क भरल्याची चलान किंवा पावती

२. बिज भांडवलाच्या परतफेडीसाठी विहित नमुन्यात २० /- चे स्टॅम्प पेपरवर करारनामा

३. लघु उद्योग नोंदणी प्रमाणपत्र

४. यंत्रसामुग्री फर्निचर इत्यादीचे दरपत्रक

५. इमारत बांधकामाचे अंदाजपत्रक

६. जागेच्या ताबाविषयक कागदपत्रे

७. पासपोर्ट फोटो

८. बिज भांडवल मंजुरी व वितरणासाठी आवश्यकतेप्रमाणे सुचित केलेले कागदपत्रे जसे जामिनदाराचे हमीपत्र दुय्यम प्रभारासाठी डिड, गहाणखत इत्यादी.

### योजनेचे वैशिष्टये

१. निमशहरी व ग्रामीण भागातील अति लहान नोंदणीकृत उद्योगासाठी ही योजना आहे.

२. या योजनेत बॅकेने मंजुर केलेल्या प्रकल्पानुसार प्रकल्प खर्चाच्या (रु. २ लाखापर्यत) २० टक्के (कमाल रु. ४०,०००/-) सर्वसाधारण सवर्गासाठी व ३० टक्के (कमाल रु. ६०,०००/-) अनुसुचित जाती / जमातीच्या उद्योजकांसाठी बिज भांडवल रुपाने कर्ज बॅक मंजुरी आदेशानंतर अनुज्ञेय ठरते.

३. या कर्ज योजनेचा फायदा माजी सैनिक / वंश परंपरागत कारागीर व कुशल कारागीर व वर्तमान उद्योग धंदा (विस्तारीकरणासाठी) करणा-यानां मिळु शकतो

४. स्थिर मालमत्ता धारण करणा-या दोन व्यक्तींनी जामिन देणे आवश्यक

५. बिज भांडवल रुपाने मंजुर केलेल्या रकमेवर एसएआय नियमाप्रमाणे द.सा.द.शे. ४ टक्के दराने व्याज आकारले जाते

६. अर्जदाराने व त्याच्या जामिनदाराने योग्य अशी करारपत्र करुन दिल्या शिवाय त्यास बिज भांडवल कर्ज वितरण केले जात नाही.

७. कर्जासाठी तारण म्हणुन ठेवण्यात आलेलया जागा, इमारत, संयत्रे , यंत्रसामुग्री, उपकरणे व इतर सर्व मालमत्ता ही सुस्थितीत व चांगल्या दुरुस्त स्थितीत ठेवणे आवश्यक आहे.

८. गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा आग व चोरीचा विमा करुन घेणे आवश्यक आहे.

९. खेळत्या भांडवलासाठी एक वर्षानंतर (कर्ज दिल्याच्या तारखेपासुन) व इतर बाबतीत दोन वर्षानंतर कर्ज दिल्याच्या तारखेपासुन कर्ज परतफेड सुरु होईल.

१०. कर्ज घेणा-यांने सर्व हप्ते नियमित परतफेड केल्यास शेवटच्या हप्त्यात एक टक्के व्याजात सुट दिल्या जाते.

११. स्थिर भांडवलासाठी बिज भांडवल परतफेड करण्याचा कालावधी विलंबावधी धरुन १० वर्ष तर खेळत्या भांडवलासाठी तो ५ वर्षाचा असतो.

**<u>योजनेची पात्रता</u>**

१. उद्योग घटक हा १ लाखापेक्षा कमी लोक वस्तीच्या ठिकाणी असला पाहिजे.

२. त्याची स्थिर मालमत्तेतील गुतवणुक जास्तीत जास्त २ लाख असावी.

३. या योजनेत शिक्षणाची व वयाची अट नाही.

४. बिज भांडवल कर्ज रकमेच्या अर्धा टक्के किंवा रु. २५०/- यापैकी किमान असलेली रक्कम छानणी फी म्हणुन भरणे आवश्यक.

-@@@@@-